Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १७] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २९-मे ५, २०२१/वैशाख ९-१५, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ३०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-४ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-४ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८४४.

### जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यांजकडून

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ (१) (क), (दोन), (चार) अन्वये अंतिम आदेश.**

क्रमांक जिउनि-नियमन-क्र-१०२-अंतिम आदेश-५२४-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ (१) (क), (दोन), (चार) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, शुध्दोधन कांबळे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया याद्वारे सुरक्षा सेव्हींग अर्बन क्रेडीट को. ऑप. सोसायटी मर्या., गोंदिया, र. नं. १०९ या संस्थेचे समापन करण्यासंबंधी अंतिम आदेश पारित करीत आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३(१) अन्वये सदरहू संस्थेचे अवसायक म्हणून श्री. आर. एस. माठुळकर, सहकारी अधिकारी, श्रेणी-१ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया यांची नियुक्ती करीत आहे.

सदरहू आदेश आज दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**शुध्दोधन कांबळे,**

गोंदिया :

दिनांक २२ मार्च २०२१.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,

गोंदिया.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८४५.

## उपनिबंधक सहकारी संस्था, यांजकडून

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १७ अन्वये आदेश.**

क्रमांक उपनिश-१-नियमन-पायल पल्लवी-एकत्रीकरण-१०५३-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १७ अंतर्गत महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाची अधिसूचना क्रमांक राजस १०१२-प्र.क्र. २२२-५-स, दिनांक १० सप्टेंबर २०१२, अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मी, सिमा पांडे, उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१, याद्वारे पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर र.नं. ४६८ व पल्लवी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., नागपूर, र. नं. ४१३ या दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करून " पल्लवी-पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर " ही नवीन संस्था, निर्माण करण्यास याद्वारे मंजूरी देत असून, नवीन संस्थेच्या एकत्रीकरणाचे नियोजन करीता प्रारूप येणेप्रमाणे आहे.—

१. अस्तित्वात असलेल्या पायल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., नागपूर र.नं. ४६८ व पल्लवी गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर र.नं. ४१३ यांचे एकत्रीकरणामुळे दोन्ही संस्थांचे एकत्रीत आर्थिक स्थिती ही, " पल्लवी-पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर " या संस्थेच आर्थिक स्थिती राहील.

२. ज्या दिवशी सध्या अस्तित्वात असलेल्या पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर र.नं. ४६८ व पल्लवी गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर र. नं. ४१३ या संस्थेचे मार्च २०२१ अखेरचे अंतिम आर्थिक पत्रके तयार करून सर्व संमतीने वार्षिक सर्वसाधारण सभेत अस्तित्वात असलेल्या संस्थेचे नोंदणी रद्द करणेबाबत तसेच दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करणेबाबतचा ठराव पारीत करून तसे वेगवेगळे प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत.

३. नियोजीत " पल्लवी-पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर " या संस्थेचे मुख्य प्रवर्तकांकडून नोंदणीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यावरच त्याची तपासणी करून सहकार कायद्याअंतर्गत रितसर नोंदणी करण्यात येईल व त्याप्रमाणे नोंदणीचे प्रमाणपत्र व उपविधी निर्गमित करण्यात येईल.

४. पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर र.नं. ४६८ व पल्लवी गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर, र.नं. ४१३ या दोन्ही मूळ संस्थेचे मालकीचे असलेले भूखंड/वाटप केलेले भूखंड इ. या नवीन पंजिबद्ध होणा-या गृहनिर्माण सहकारी संस्थेला आपोआप वर्ग होवून त्यावर नवीन संस्थेचा मालकी हक्क प्रस्थापित होईल. त्यानूसार अस्तित्वात असलेल्या दोन्ही संस्थेने जमिनीचे मूळ दस्तऐवज जसे की, खरेदी खत, विक्रीपत्र, कारारनामे, मंजूर प्लान, कोर्ट केसेस, पत्र व्यवहार धारीका व इतर सर्व महत्त्वाचे दस्तऐवज संबंधित आवश्यक दस्तऐवज मूळ स्वरूपात नवीन पंजिबद्ध होणा-या नियोजित संस्थेच्या मुख्य प्रवर्तक यांना रितसर यादी तयार करून हस्तांतरीत करून त्याची पोच संस्था दफ्तरी ठेवावी.

५. ज्यांचे एकत्रीकरण करावयाचे आहे त्या दोन्ही संस्थांचे बँक खात्यातील रक्कम हे नियोजित संस्था पंजिबद्ध झाल्यास त्यांचे खात्यात वळती करण्यात यावे.

६. ज्यांचे एकत्रीकरण करावयाचे आहे त्या दोन्ही संस्थेतील सभासदांची काही थकीत रक्कम येणे/देणे असल्यास अशी रक्कम नियोजित संस्था पंजिबद्ध झाल्यास त्यात जमा/देण्यात येतील.

७. नियोजित " पल्लवी-पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर " संस्था नोंदणी प्रकरणासोबत सध्याचे दोन्ही संस्थेचे सभासदांची सामूहिकरीत्या नियोजित संस्थेच्या एकत्रीकरणासाठी तसेच नियोजित संस्थेत सामिल होण्याबाबत संमतीपत्र सादर करावे.

८. पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर, र. नं. ४६८ व पल्लवी गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर, र. नं. ४१३ या संस्थेच्या बाबतीत सभासदांची काही वाद, तक्रारी असल्यास त्यांचा निपटारा नियोजित " पल्लवी-पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर " संस्थेने करावा.

९. संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ किंवा भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ यात काहीही अंतर्भूत असले तरीही, एकत्रीकरण करण्यात येईल त्यावेळी एकत्रीकरण झाल्यावर, एकत्रीकरणाशी संबंधित असलेल्या संस्थांचा ठराव प्रत्येक बाबतीत मूळ संस्थेशी किंवा एकत्रीकरण केलेल्या संस्थांची मत्ता व दायित्वे नव्या संस्थेत किंवा एकत्रीकृत संस्थेमध्ये निहित होण्याबाबतचे पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असेल.

१०. संस्थेचे एकत्रीकरण केल्यामुळे एकत्रीकरण केलेल्या संस्थांचे कोणतेही हक्क किंवा बंधन यावर परिणाम होणार नाही किंवा ज्यांचे एकत्रीकरण करण्यात आले असेल, अशा संस्थांकडून किंवा संस्थाविरूद्ध जी न्यायीक कार्यवाही चालू ठेवण्यात किंवा सुरू करण्यात आली असेल अशी कोणतीही न्यायीक कारवाई सदोष ठरणार नाही आणि, अशी न्यायीक कार्यवाही एकत्रीकृत संस्थेस किंवा यथास्थिती संस्थेविरूद्ध चालू ठेवता येईल किंवा सुरू करता येईल.

११. एकत्रीकरण करण्यात येणा-या दोन्ही संस्थेतील सदस्य हे स्वेच्छेने नवीन पंजिबंद्ध होणा-या संस्थेचे सदस्य होतील व त्यांना सर्वसाधारण सभासदांचे सर्व अधिकार राहतील.

१२. पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर, र.नं. ४६८ व पल्लवी गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर, र.नं. ४१३ या संस्थेतील जे सभासद नियोजित "पल्लवी-पायल गृहनिर्माण सहकारी संस्था, मर्या., नागपूर" संस्थेचे सभासद होवू इच्छित असतील त्यांना त्यांचे जुने भाग-दाखल्यांचे ऐवजी नवीन संस्थेचे भाग निर्गमित करावे.

१३. नवीन पंजिबद्ध होणा-या संस्थेची संस्था नोंदणी नंतर प्रथम सर्वसाधारण सभेत हंगामी संचालक मंडळाची निवड करावी व तद्नंतर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण मार्फत ५ वर्षाकरीता नवीन संचालक मंडळ निवडणूक घेण्याबाबत तजविज करावी.

सदर आदेश आज दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**सिमा पांडे,**
उपनिबंधक, सहकारी संस्था,
नागपूर, शहर-१.

नागपूर (शहर-१) :
दिनांक २४ मार्च २०२१.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८४६.

## सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, यांजकडून

क्रमांक सनिव-नियम-नोंदणी-साधनसंपत्ती संस्था-संस्कार महिला नागरीपत-११२-२०२१.—

मी, प्रकाश भजनी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका वर्धा, मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यात येत आहे की, संस्कार महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., वर्धा, तालुका जिल्हा वर्धा ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम क्रमांक २४, कलम ९ (१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे. तिचा नोंदणी क्रमांक WDA-WDA-RSR (CR)-४२८-२०२०-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

उपनिर्दिष्ट अधिनियमामार्फत कलम १२ (१) अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण "साधन संपत्ती संस्था", असून उपवर्गीकरण "कर्ज देणा-या साधन संपत्ती संस्था" आहे.

**प्रकाश भजनी,**
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
तालुका वर्धा.

वर्धा :
दिनांक २५ जानेवारी २०२१.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८४७.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ (१) (क), (दोन) व (चार) अन्वये अंतिम आदेश.**

**वाचा.—** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ (१) (क), (२) व (४) अंतर्गत वैधानिक तरतूद.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश क्रमांक १८५३-२०१९, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९.

(३) संस्थेचे प्राधिकृत अधिकारी यांचा दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ चा अहवाल.

ज्याअर्थी, नवतरूण सुशिक्षीत बेरोजगार बहुउद्देशिय सेवा सहकारी संस्था, मर्या., वर्धा, र.नं. ३८८, ता. जि. वर्धा, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम, १९६१ अंतर्गत नोंदणी झालेली असून संस्थांचे कामकाज कायदा, नियम व उपविधितील तरतुदीनूसार तसेच शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार चालणे बंधनकारक आहे ;

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, नियम व संस्थेची मंजूर उपविधी व वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासकीय परिपत्रकातील तरतुदीनुसार संस्था चालविणे बंधनकारक आहे. परंतु, सदर संस्थेने कोणत्याही नियमाचे पालन केल्याचे दिसून येत नाही. संस्थेने उपविधितील उद्देशाप्रमाणे कामकाज करणे सुरू केलेले नाही. सदर संस्थेने शासनाच्या संकेतस्थळावर स्वतःची प्रोफाईल तयार केलेली नाही. सदर संस्था दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी निवडणुकीस पात्र होती. सदर संस्थेने मतदार यादी सादर करून निवडणूक निधी भरणा करून नमुना ई-२ मधील माहिती भरून संचालक मंडळाचा कालावधी संपण्याचे चार महिने आगोदर निवडणूक प्रक्रिया सुरू करणे मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारण म.रा. यांचे निवडूक नियमावलीनुसार बंधनकारक आहे ;

आणि ज्याअर्थी, वाचा क्रमांक (२) अन्वये संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती झाली असतांना प्राधिकृत अधिकारी यांना कोणताही पदभार दिलेला नाही ;

आणि ज्याअर्थी, वाचा क्रमांक (३) अन्वये संस्थेचे प्राधिकृत अधिकारी यांचे अहवालानुसार संस्थेला निवडणुकीकरीता वारंवार निवडणूक निधी व मतदार यादी सादर करण्याबाबत सांगण्यात आले असून अद्यापही कार्यवाही केलेली नाही तसेच संस्थेने २०१९-२०२० चे लेखापरीक्षणाकरीता प्रमाणित लेखापरीक्षक श्री. देवतारे यांना रेकॉर्ड उपलब्ध करून दिलेला नाही. तसेच संस्थेचे अध्यक्ष व सभासद संस्था चालविण्यास इच्छुक नसल्याबाबत व संस्था बंद करण्याबाबत उपरोक्त वाचा क्रमांक (३) अन्वये कार्यालयास लेखी कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, संस्थेचे पदाधिकारी तसेच सभासद संस्थेचे कामकाज चालवण्यास उत्सुक नाही व संस्थेने अधिनियमातील किंवा उपविधीतील नोंदणी व व्यवस्थापन याबाबतच्या शर्तीचे अनुपालन करणे बंद केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त कायद्यानुसार सदर संस्था समापन करण्यास पात्र आहे. अशी या कार्यालयाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

क्रमांक सनिव-नियमन-अंतरिम आदेश-२२७-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ (१) तसेच महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सी.एस.एल. १४९३-११६२-सी.आर-४७-१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट, १९९३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, आर. एल. वाघे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका वर्धा नवतरूण सुशिक्षीत बेरोजगार बहुउद्देशिय सेवा सहकारी संस्था, मर्या., वर्धा, र.नं. ३८८, ता.जि. वर्धा ही संस्था वर नमूद कारणास्तव संस्थेने समापन करण्याकरीता अवसायकाचा अंतरिम आदेश पारित करण्यात येत आहे. कलम १०३ (१) मधील तरतुदीनूसार या संस्थेच्या अवसायकपदी सौ. ए. एस. राऊत, सहकार अधिकारी, श्रेणी-२, वर्धा यांची नियुक्ती करीत आहे.

सदर आदेश आज दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारित करण्यात येत आहे.

**आर. एल. वाघे,**
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. वर्धा.

वर्धा :
दिनांक २६ फेब्रुवारी २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.